शासन सेवेतील मागासवर्गीय/अमागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी यांची पदोन्नत संवर्गात आपापसातील ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-1096/प्र.क्र.32/96/बारा.

मंत्रालय, मुंबई 400 032 दिनांक 20 ऑक्टोबर 1997.

वाचा :- 1) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1076/12, दिनांक 21 जून 1982

2) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1096/प्र.क्र.32/96/बारा, दिनांक 19 एप्रिल 1997.

**शासन निर्णय** :- केंद्र शासन विरुध्द विरपालसिंग चौहान इ. (केस नं.जेटी-1095 (7) एस.सी.931, दिनांक 10 ऑक्टोबर 1995) प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अनुसरून व केंद्र शासनाच्या कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे दिनांक 30 जानेवारी 1997 चे आदेश विचारात घेऊन राज्य शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीत ज्येष्ठता विनियमित करण्याबाबत दिनांक 19 एप्रिल 1997 रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. आता जगदिशलाल विरुध्द हरयाणा राज्य शासन आणि इतर (केस नं.जेटी-1997 (5) एस.सी.387, दिनांक 7 मे 1997) प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, दिनांक 19 एप्रिल 1997 रोजी आदेश अधिक्रमित करण्यात येत आहेत व सुधारित आदेश खालीलप्रमाणे आहेत :-

2. (अ) एखादा मागासवर्गीय कर्मचारी/अधिकारी पदोन्नत संवर्गात अगोदरच पदोन्नत झाला असेल तर त्याची ज्येष्ठता त्या संवर्गात पुनर्विलोकीत करण्याची आवश्यकता नाही. तसेच दिनांक 30 जानेवारी 1997 रोजी अस्तित्वात असलेल्या ज्येष्ठता याद्या सुधारित करण्याची देखील आवश्यकता नाही.

(ब) संबंधित कर्मचारी/अधिकारी त्यांच्या त्या त्या संवर्गातील नियमित नियुक्तीच्या दिनांकापासून, ज्येष्ठता विनियम, 1982 मधील तरतुदीनुसार आपली ज्येष्ठता कायम राखील.

(क) ज्येष्ठता निर्धारित करण्यासंबंधीचे वरील तत्व शासन सेवेतील सर्व गटातील सर्व स्तरांवरील पदोन्नत्यांच्या संदर्भात लागू राहील.

3. वरील खुलासा लक्षात घेता, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-1076/12, दिनांक 21 जून 1982 च्या अधिसूचनेअन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठता विनियम) नियम, 1982 मध्ये आता सुधारणा करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

20 NOV 1997

रवि भू. बुध्दिराजा,
प्रधान सचिव (सेवा).

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

मुख्य मंत्री यांचे सचिव,

उप मुख्य मंत्री यांचे सचिव,

(कृ.मा.प.